# आकाशवाणी नागपूर,
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)
# शुक्रवार दिनांक १८ ऑक्टोबर २०२४

**ठळक बातम्या**

1. **उद्या दिनांक १९ ऑक्टोबर पर्यंत मतदार यादीत आपलं नाव नोंदवण्याची संधी; ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीनं नाव नोंदविण्याचं मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांचं आवाहन.**
2. **कर्मयोगी सप्ताहास उद्यापासून प्रारंभ; प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख बनविण्यासाठी कर्मचाऱ्यांना मिळणार प्रशिक्षण.**
3. **आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप आणि मित्रपक्षांना पराभवाची भीती वाटत असल्यानं मतदार याद्यांमध्ये फेरफार करण्याचा प्रयत्न होत असल्याचा महाविकास आघाडीच्या नेत्यांचा आरोप.**

**आणि**

4. **महाराष्ट्रात महायुतीची सगळ्यात पहिली उमेदवारी शिवसेना शिंदे गटाचे रामटेकचे विद्यमान आमदार आशिष जयस्वाल यांना जाहीर.**

## आता सविस्तर बातम्या .......

एस.चोकलिंगम

२० नोव्हेंबर रोजी महाराष्ट्रातील एकूण 288 विधानसभा मतदारसंघात एकाच टप्प्यात मतदान होणार आहे. ज्यांनी आपलं नाव मतदार यादीत अद्याप समाविष्ट केलेलं नाही त्यांना उद्या दिनांक १९ ऑक्टोबर पर्यंत मतदार यादीत आपले नाव नोंदवण्याची संधी असल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी सांगितलं.

**होल्ड बाइट 40 सेकंद )**

***20 नोव्हेंबरला मतदान होणार आहे मतदाराच्या दिवशी मतदान यादीत आपले नाव आहे का असं काही मतदार शोधतात. आणि त्यांचे नाव नसतील त्यावेळेस मतदान यादीत आपले नाव नसतील तर अडचणी येतात. मतदान यादीत आपले नाव आहे का हे तपासणीचा दिवस मतदानाचा दिवस नसून आज आहे. आपण सर्वांनी कृपया आपले नाव मतदार यादीत आहे का हे तपासावे आणि नसेल तर येणाऱ्या 19 ऑक्टोंबर 2024 रात्री पर्यंत ऑनलाइन किंवा ऑफलाइन अर्ज भरावे जेणेकरून आपल्याला यावेळेस मतदान करता यादीमध्ये आपले नाव इंक्लुड करता येईल आपल्या सर्वांना विनंती आहे वेळेत अर्ज करावे आणि या वेळेस च्या निवडणुकीत भाग घ्यावे.***

गृहमतदान

जेष्ठ नागरिकांमध्ये ज्यांचं वय 85 वर्षांपेक्षा अधिक आहे आणि दिव्यांग मतदार यांच्यासह, निवडणूक कर्तव्यानिमित्त नियुक्त करण्यात आलेल्या, कर्मचारी मतदारांना आपल्या मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भारत निवडणूक आयोगाने कार्यपध्दती विहित करुन दिली आहे. या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांमध्ये कोणताही मतदार आपल्या हक्कापासून वंचित राहू नये यादृष्टीनं 85 वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या आणि दिव्यांग मतदारांना, गृह मतदानाचा लाभ उपलब्ध करुन दिला जात असल्याचं जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी सांगितलं. नागपूर जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदार संघात निवडणूक प्रक्रिया काटेकोरपणे राबविली जावी या उद्देशानं आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. गृह मतदानासाठी नमुना 12-ड तत्काळ उपलब्ध करुन देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. टपाली मतपत्रिकेद्वारे मतदान करु इच्छिणाऱ्या तसंच निवडणूक कर्तव्यासाठी प्रमाणपत्राद्वारे मतदान करु इच्छिणाऱ्या मतदान कर्मचाऱ्यांसाठी अनुक्रमे नमुना 12 आणि 12-अ हे एनआयसी मार्फत उपलब्ध करुन दिले जात असल्याचं त्यांनी सांगितलं.

पुर्वतयारी आढावा

आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूककरिता होणा-या निवडणूकीच्या पार्श्वभुमीवर वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट मतदार संघामध्ये पुर्वतयारी सुरु झालेली असुन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून आढावा घेतला. हिंगणघाट विधानसभा मतदार संघाच्या मतदान झालेल्या मतदान यंत्राची साठवणुक, त्याची सुरक्षा आणि त्या अनुषंगाने कार्यालयामध्ये तयार करण्यात आलेल्या सुरक्षाकक्षाचा तसंच यंत्रणेचा तसेच विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पूर्वतयारीचा आढावा उपविभागीय कार्यालयात सभा घेऊन आज घेतला.

'कर्मयोगी सप्ताह'

पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या दिनांक 19 ऑक्टोबर रोजी सकाळी 10:30 वाजता नवी दिल्ली इथल्या आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर, इथून 'कर्मयोगी सप्ताह' या राष्ट्रीय अध्ययन सप्ताहाचा शुभारंभ करणार आहेत. `मिशन कर्मयोगी’ या उपक्रमांतर्गत २०२० पासून भारतीय प्रशासकीय सेवकांसाठी वैयक्तिक आणि संस्थात्मक क्षमतांचा विकास करण्यासाठी अनेक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रमांचा यात समावेश केला गेला आहे. राष्ट्रीय अध्ययन सप्ताहात प्रत्येक कर्मयोगी संस्थात्मक सक्षमीकरणासाठी किमान 4 तासांचं प्रशिक्षण घेईल. त्यासाठी iGOT कर्मयोगी सारखा डिजीटल मंच वापरला जाईल. iGOT कर्मयोगी या संकेत स्थळावर संस्थात्मक मूल्य, कार्यपद्धती, तंत्रज्ञानाची ओळख,

सायबर सुरक्षा, आदी विषयांच्या कल्पक सादरीकरणातून अभ्यास करता येईल. विविध विषयांवरील अभ्यासक, चर्चा सत्रे आदी माध्यमांतून प्रशासन अधिकाधिक लोकाभिमुख बनवणं हा 'कर्मयोगी सप्ताहाचा उद्देश आहे.

'आढावा विधानसभा मतदारसंघांचा'

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं 'आढावा विधानसभा मतदारसंघांचा' हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज नंदुरबार आणि धुळे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

नाना पटोले पत्रपरिषद

महाराष्ट्रात आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप आणि मित्रपक्षांना पराभवाची भीती वाटत असल्यानं मतदार याद्यांमध्ये फेरफार करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आज केला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार अनिल देसाई, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जितेंद्र आव्हाड आणि महाविकास आघाडीच्या इतर नेत्यांनी या संदर्भात पत्रकार परिषद घेऊन महायुती सरकारवर टीकास्त्र डागलं. सात क्रमांकाच्या अर्जाद्वारे मतदार नोंदणी करण्याची प्रक्रिया संशयास्पद असून त्याबद्दल श्वेतपत्रिका काढण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी पाटोले म्हणाले की --------

**(होल्ड बाईट २४ सेकंड)**

***फॉर्म सात अर्जामध्ये कारण की फॉर्म सात जो असतो या माध्यमातून खोटे ऑनलाईन अर्ज केले जातात हे आपल्याला उघडकीस आलेलं आहे. आणि त्या ठिकाणी काँग्रेस विचारांचे उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचे शरद पवार साहेबांच्या विचारांचे हे मत कमी करण्याचं काम त्या लोकांनी सुरू केलेल आहे त्याकडे तातडीने निवडणूक आयोगानं लक्ष घालावं.***

लोकसभा निवडणुकीत ज्या ठिकाणी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना जास्त मतं मिळाली, तिथं मतदार याद्यांमध्ये फेरफार करून नावं कमी करण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करत असल्याचा आरोपही महाविकास आघाडीनं केला. राज्याच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांना हटवायला निवडणूक आयोगानं नकार दिल्यावरून त्यांनी आयोगावर टीका केली. सरकारच्या योजनादूत योजनेद्वारे जनतेच्या पैशाची उधळपट्टी होत असून ही योजना रद्द करावी, अशी मागणीही निवडणूक अधिकाऱ्यांकडे करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. ज्येष्ठ आणि दिव्यांग नागरिकांसाठी घरी जाऊन मतदानाची प्रक्रिया

पारदर्शक पद्धतीनं पार पडावी, ही मागणी करून, निवडणुकीच्या काळात नागरिकांनी जागरूक राहावं, यादीतलं आपलं नाव वारंवार तपासून घ्यावं, असं आवाहन नाना पटोले यांनी केलं. दरम्यान या संदर्भात राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोकलिंगम यांना कारवाईची मागणी करणारं पत्र महाविकास आघाडीच्या वतीनं देण्यात आलं आहे.

रेड्डी - जयस्वाल/रामटेक

महाराष्ट्रात महायुतीची सगळ्यात पहिली उमेदवारी आपल्याला जाहीर झाली हा आपल्या कामाचा आणि आपल्या मतदारसंघातील जनतेचा सन्मान आहे असं प्रतिपादन रामटेकचे विद्यमान आमदार आशिष जयस्वाल यांनी केलं. 2019 मध्ये जयस्वाल यांनी भाजपच्या मल्लिकार्जून रेड्डीविरूद्ध अपक्ष म्हणून निवडणूक जिंकली होती. यंदा आपण 50 हजारांपेक्षा अधिक मताधिक्याने जिंकू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.दरम्यान, पक्ष विरोधी कारवायांसाठी भाजपने निलंबित केलेले मल्लिकार्जुन रेड्डी यांनी पत्रकार परिषद घेऊन रामटेक मधून भाजप कार्यकर्त्याला डावलून शिवसेना शिंदे गटाच्या जैसवाल यांना उमेदवारी दिल्या बद्दल खंत व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पारशिवणी सभेच्या वेळी आपल्याला विश्वासात न घेता जयस्वाल यांना रामटेकची उमेदवारी घोषित केल्याचं ते म्हणाले.

आठवले गट

भारतीय रिपब्लिकन पक्ष -आठवले गटाचे अध्यक्ष आणि केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज आगामी विधानसभा निवडणुकीसाठी भाजपकडे वीस जागांची मागणी केली आहे. या संदर्भात आपण लवकरच देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. वीस जागांमध्ये नागपूर जिल्ह्यातील उत्तर नागपूर मतदारसंघ, यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड मतदारसंघ, वाशिम आणि चंद्रपूर या जागांचा समावेश आहे. याशिवाय बीड जिल्ह्यातील-केज; सोलापूर जिल्ह्यातील-मोहोळ; सातारा जिल्ह्यातील- फलटण; कोल्हापूर जिल्ह्यातील - हातकणंगले; मुंबईतील धारावी, नांदेड मधील देगलूर, पुणे जिल्ह्यातील पिंपरी, नाशिक जिल्ह्यातील देवळाली, अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर, जालना जिल्ह्यातील बदनापूर, जळगाव जिल्ह्यातील भुसावळ, ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ-कल्याण, छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील फुलंब्री, मुंबईतील चेंबूर आणि मालाड तर, मुंबईतील मानखुर्द- शिवाजीनगर या जागांचा समावेश आहे.

परिवर्तन महाशक्ती

विधानसभा निवडणुकीसाठी विविध संघटनांनी एकत्र येत स्थापन केलेल्या ‘परिवर्तन महाशक्ती आघाडी’चे राज्यातील १५० जागांवर एकमत झालं आहे. परिवर्तन

महाशक्तीची वज्रमूठ महायुती आणि महाविकास आघाडीला टक्कर देईल, असा दावाही परिवर्तन महाशक्तीच्या पदाधिकाऱ्यांनी केला. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर 'परिवर्तन महाशक्ती'ची बैठक काल पुण्यातल्या शिवाजीनगर इथल्या स्वराज्य भवन इथं झाली. महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे अध्यक्ष छत्रपती संभाजीराजे, प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी, स्वतंत्र भारत पक्षाचे वामनराव चटप, महाराष्ट्र राज्य समितीचे शंकरअण्णा धोंडगे, भारतीय जवान किसान पक्षाचे नारायण अंकुशे यांच्यासह अन्य समविचारी संघटनांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

पक्ष प्रवेश

विधानसभा निवडणूकीच्या पाश्वभूमीवर आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ कार्यकर्ते माजी नगरसेवक नाना बागुल तसंच सिंधी समाजाचे ज्येष्ठ नेते नंदलाल वाधवा यांनी आज रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) या पक्षात जाहिर प्रवेश केला. मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी ही माहिती दिली.

*****